

श्रम हाच जीवनाचा स्रोत







# नवनीत

२०१४-१५



# श्रम हाच जीवनाचा स्रोत

वार्षिक प्रकल्प हे क.निं.बा.चे वैशिष्ट्य आहे. एक-दोन वर्ग किंवा कधीकधी संपूर्ण शाळा मिळून देखील एक विषय घेऊन आपापल्या टप्प्यांवर त्या विषयाचा विविध अंगांनी अभ्यास करते. मिळालेली माहिती, त्यातून काढलेले निष्कर्ष, त्यातून तयार झालेली नवी समज असं सगळं चित्रं, कविता, आलेख, प्रतिकृती यांच्या माध्यमातून मांडलं जातं. हे प्रदर्शन चांगलं मोठं असतं, आणि ते पाहण्यास सर्व फलटणकरांना निमंत्रण असतं.

प्रकल्पाचे विषय मुलांच्या रोजच्या आयुष्याला, परिसराला स्पर्श करणारे असतात. त्यामुळं मुलांना ते मांडता येतात. एखाद्या विषयाची सखोल माहिती मिळवण्याची व त्यातून शिकण्याची प्रक्रिया मुलांच्या ओळखीची होते. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वासही वाढतो.

याच अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१४-२०१५ साठी गावगाड्यातील जाती-जमातींचे समाजजीवन याचा विद्यार्थ्यांकडून विविधांगी अभ्यास व्हावा, ते करत असलेले काम त्यातील ज्ञान , विज्ञान, तंत्रज्ञान, त्यासाठीचे श्रम आणि कौशल्ये याची खोलवर जाऊन माहिती घ्यावी आणि ते काम प्रत्यक्ष कृतीतून करून पहावे म्हणून या श्रम हाच जीवनाचा स्रोत हा प्रकल्पाचा विषय घेतला. इयत्ता पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांनी विविध कारागिरांबद्दलची माहिती प्रत्यक्ष मुलाखती घेऊन मिळवली. त्यासंदर्भात मिळालेल्या माहितीवरून माहिती , चित्रे , प्रतिकृती याद्वारे एक अनुभवपूर्ण असा प्रकल्प उभा राहिला. त्यातीलच काही रेखाचित्रे मुखपृष्ठावर झळकत आहेत. तर प्रत्येक्ष मुले काम करतानाची काही क्षणचित्रे मागील पान आणि मलपृष्ठावर दर्शविली आहेत.

या प्रकल्पाच्या निमित्ताने मुलांनी या श्रमजीवी लोकांचे काम त्यातील विज्ञान, तंत्रज्ञान व कौशल्य याचाच नुसताच अभ्यास केला नाही तर ही सर्व कामे स्वतः करून पाहिली आहेत. ही कामे करताना समाजात जरी लिंगभेद केलेला असला तरी इथे तो भेद झालेला नाही. काही मुलींनी सुतार कामाचा अनुभव घेऊन शाळेतील काही नादुरस्त खुर्च्या दुरुस्त केल्या. कोणत्याही कामाचे वर्गीकरण अथवा मुल्यांकन लिंगभेदानुसार कधीच नसते हे मुलांना उमगत केले हे या प्रकल्पामागील एक साध्य पूर्ण होताना दिसत आहे.

यामुळे कोणतेही काम हे हलके अथवा कमी जास्त दर्जाचे नसते. कोणतेही कामे हे आपल्याला आनंद देते. हे श्रमजीवी लोक समाजासाठी काम करतात म्हणून आपण चांगले जगू शकतो याची जाणीव मुलांना होऊन गेली. या प्रकल्पातून कोत्याही कामाबद्दलची मुलांची आस्था, प्रेम, समज चांगल्या आणि योग्य प्रकारे सांधली गेली. कामाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलून गेला. जे आमच्या प्रकल्प पद्धतीचे मूल आम्ही समजतो.

गेल्या २५ वर्षात अनेक विध प्रकल्प आणि विषय शाळेने हाताळले आहेत. आज असे वाटते की कमला निंबकर बालभवन समाजाला काय देऊ शकते? उपक्रम व प्रकल्प विषयांची यादी नव्हे तर विचार आणि परिस्थितीचे भान ठेवून शाळारूपी रोपट्याची निगा कशी राखायची याचा मंत्र!

या नवनीतच्या मुखपृष्ठाची शोभा मुलांच्या कामाने वाढली आहे, तर मलपृष्ठाचे सुशोभीकरण मुलांच्या प्रकल्पाच्या क्षणचित्रांनी झाले आहे.

**- प्रकाश अनभूले**

प्रगत शिक्षण संस्था, फलटण
वार्षिक पत्रिका

# नवनीत

## मे २०१५

**संपादकीय सहाय्य**

मंजिरी निमकर    मधुरा राजवंशी
कल्पिता दंडवते    अरुणा शेवाळे

**रेखाचित्रे**
आराधना पाटील, जितेंद्र काकडे
सिद्धांत निकाळजे, वरद इनामदार
श्रीया पाटील,
(मार्गदर्शक- कल्पिता दंडवते)

**मुखपृष्ठ मांडणी**
वसीम मणेर

**अनेक कथा व कवितांची चित्रे त्या त्या लेखक व कवींनी काढलेली आहेत.**

**प्रकाशन:** प्रगत शिक्षण संस्था, रिंग रोड, फलटण ४१५ ५२३

**संगणकीय अक्षरजुळणी:** प्रकाश अनभूले, सुषमा पंडित, विशाल मोहिते

**छपाई:** ग्रीन ग्राफिक्स, सी -१०२, सुनिता आपार्टमेंट, १४१७ कसबा पेठ, पुणे-४११०११

**फोन:** ०२१६६-२२३०४१

**email** : pragatshikshansanstha@gmail.com
**website** : www.pragatshikshansanstha.org

# अनुक्रमणिका

प्रस्तावना/मधुरा राजवंशी /३
पांढऱ्या पेशी/ आयान मुलाणी इ. २ री/ ५
दादाचे ऑपरेशन/ शरयू माने/ इ. २ री/ ६
टर टर / शरयू माने, अनुष्का धायगुडे/ इ. २ री/ ७
जत्रा/ महेश भिसे/ इ.३ री/ ८
माकड/ तनिष्का मदने/ इ. ३ री/ ८
गोलूची गोष्ट/ नूतन सूर्यवंशी/ इ. १ ली/ ९
'ळी' ची कविता/ सिध्दी जगदाळे/ इ. २ री/ १०
वाघ दिसला/ साक्षी कोळेकर/ इ. ३ री/ १०
माय-लेकी/ धनश्री शहा, कल्याणी पवार/ इ. ३ री/ ११
खंडूने वाचवले/ अमित कदम/ इ. ५ वी/ १२
आजी/ तस्मिया मोमीन/ इ. ५ वी/ १३
बारिश आई बारिश आई/ जिया मोमीन/ इ. २ री/ १३
नकली हाडळ/ अभय जाधव/ ५ वी/ १४
आदित्यचा दवाखाना/ सोहम दोशी/ इ. ५ वी/ १५
जंगल समस्या/ रूपल पाटोळे/ इ. ५ वी/ १६
हमने बनाया किला/ आनम शेख/ इ. ५ वी/ १८
बाजार/ यशवर्धन वाळा/ इ.७ वी/ १९
आजोबांचा वाढदिवस/ शिवांजली ढेंबरे/ इ. ६ वी/ २०
रेल्वेची करामत/ प्रसाद थोरात/ इ. ६ वी/ २२
नानी माँ ओ नानी माँ/ गायत्री शिंदे, रूचिका कुंभार, प्रतिक काकडे, ऋतुराज कुंभार, स्नेहा काकडे/ इ. ६ वी/ २४
मधली सुट्टी/ चिन्मया कुमठेकर/ इ. ७ वी/ २५
काव काव/ सिध्दी शिरोळकर/ इ. ७ वी/ २७
भाकरी/ जिऊ निमकर/ इ.७ वी/ २९
महत्वपूर्ण बातें/ रेहान आतार/ इ. ८ वी/ ३०
भंडारा/ ऋतिक माने/ इ. ९ वी/ ३१
माझ्या गाड्या/अर्चित परूळेकर/ इ. ९ वी/ ३२
मायेचं झाड/ मृणाली साळुंखे/ इ. ७ वी/ ३३
Our shop of flowers/ Aradhana Patil/ 6th/ 34
Rainy insects/ Aradhana Patil, Atharva Hampe, Pratik Saste/ 6th/ 35
Funny swimming incident/ Samiksha Dixit/ 10th/ 36

# प्रस्तावना

नव्या वर्षाचे नवे नवनीत आपल्या सर्वांसमोर ठेवताना फार आनंद होतो आहे. यावेळचा अंकही मुलांच्या अनुभवकथनांनी, काल्पनिक गोष्टींनी, कवितांनी व चित्रांनी नटलेला आहे.

आपण अनुभवलेल्या घटनांचे बारकावे टिपत मुलांनी रसाळ लेख लिहिले आहेत. प्रत्येकाने आपल्या स्वतंत्र शैलीत आपले लेखन फुलवले आहे. आनमने 'हमने बनाया किला' मध्ये किल्ला बनवण्याची संपूर्ण प्रक्रिया सुरेख उभी केली आहे. किल्ल्यावरच्या पायऱ्या, गुहा, शेत, तलाव, कारंजे यांचे वर्णन वाचताना किल्ला समोर बनतो आहे असे वाटते. 'रेल्वेची करामत' मध्ये रेल्वेची वाट पाहात बसण्याचा कंटाळा प्रसाद सहजतेने वाचकांमध्येही उतरवतो आणि शेवटी रेल्वे येते तेव्हा वाचणाऱ्यालाही हायसे वाटते. संवादांची पेरणी करून आपला लेख अधिक रंजक बनविण्याचा अभय, शिवांजली, जिऊ, आराधना यांचा प्रयत्न त्यांचे वाचन उत्तम असल्याचे दाखवून देतो.

आपले अनुभव आपल्या लिखाणामध्ये मुले अतिशय प्रामाणिकपणे मांडतात असे वाचताना जाणवते. वाघाबद्दल नुसता विचार करून साक्षीची उडालेली घाबरगुंडी असो, मधल्या सुट्टीत साबण लवकर मिळावा म्हणून वर्गात नखे कुरतडण्याबद्दल चिन्मयाने दिलेली कबुली असो, गाड्यांच्या जुन्या भागांपासून नवी गाडी तयार करण्याचे अर्चितने स्वीकारलेले अवघड आव्हान असो, किंवा स्वत:च्याच फजितीचे समीक्षाने केलेले वर्णन. मनावर तणाव नसताना लेखन किती छान फुलते याचीच प्रचिती हे लेख वाचताना येते.

कुटुंबातील व्यक्तींना एकमेकांबद्दल वाटणारे प्रेम व काळजी 'पांढऱ्या पेशी', 'दादाचे ऑपरेशन', 'आजोबांचा वाढदिवस', 'आजी', या लेखांमधून दिसते तर प्राण्यांविषयीच्या प्रेम 'गोलू', 'खंडूने वाचवले', 'जंगल समस्या: एक स्वप्न', 'काव काव' यांमधून व्यक्त होते. 'मायेचे झाड' या कवितेत मृणालीची स्वत:च्या शरीराचे झाडामध्ये रूपांतर होण्याची कल्पना तर मनाला फारच भावते. व्यक्ती आणि निसर्गाप्रती प्रेम व्यक्त करणारे मुलांचे लिखाण वाचून खूप आशादायी वाटते.

या सर्वांत सोहमने लिहिलेल्या 'आदित्यचा दवाखाना' या गोष्टीचा विशेष उल्लेख करावासा वाटतो. कुंभाराच्या मुलाने व्यवसाय बदलल्यामुळे उच्चवर्णीय लोकांना आलेला राग व नंतर त्यांना आदित्यने दिलेली समज यातून सोहमची तरल संवेदनशीलता झळकते. गेल्या वर्षीच्या श्रमप्रतिष्ठेविषयीच्या वार्षिक प्रकल्पाचे उद्दिष्ट मुलांपर्यंत पोहोचल्याचे समाधान ही गोष्ट वाचताना मिळते.

यावेळच्या अंकात दोन विनोदी अंगाने जाणारे लेख आहेत. अभयने 'नकली हाडळ' या लेखात छान वातावरण निर्मिती केली आहे. त्याचे हडळीसोबतचे संभाषण तर फारच विनोदी! ऋतिकचा 'भंडारा' वाचताना हरभरा टाकून पळणारा ऋतिक आणि त्याला ताणणारा शेतकरी डोळ्यांसमोर येऊन हसू आल्याशिवाय राहवत नाही.

या अंकातील कविताही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. दुसरीतल्या सिद्धी जगदाळेच्या 'ळी' या कवितेत तिला असणारे 'यमका'चे भान स्पष्ट दिसते. यशवर्धनची 'बाजार' ही कविता खूप छोटी, पण भाजीविक्रेते व गिऱ्हाईक यांच्यातील नेहमीच्या संभाषणाला अतिशय नेमकेपणाने कैद करते. रेहानच्या 'महत्वपूर्ण बातें' ने जगाला गवसणी घातली आहे. कुठे काय महत्वाचे आहे हे रेहान आपल्या मिश्किल आणि खुमासदार शैलीत मांडतो. 'नानी माँ ओ नानी माँ' ही कविता हिंदी विषयाच्या गटकामामध्ये केलेली आहेत. गटातील सर्वांचे विचार यात एकत्रितपणे गुंफलेले दिसतात. इंग्रजी विषयाच्या Rain या थीमअंतर्गत गटात बनवलेली 'Rainy insects' ही कविताही सुरेख!

सातवीच्या वर्गात हिंदीच्या तासाला ताईंनी अक्षरांवरून चित्रे बनवून घेतली होती. उदाहरणार्थ क हे अक्षर असेल तर क पासून सुरु होणाऱ्या एखाद्या हिंदी शब्दाचे चित्र क अक्षराचाच वापर करून बनवायचे. त्यावरूनच कल्पना घेऊन 'टर टर' ची भन्नाट चित्रे तयार झाली आहेत. गोल आकारांनी बनलेले गोलमटोल गोलू आणि आळी फारच गोड. मोठ्या मुलांच्या चित्रांतून त्यांची स्वत:ची स्वतंत्र शैली विकसित होत असल्याचे जाणवते. आराधना, श्रीया, मृणाली यांच्या चित्रांमध्ये साडीवरची नक्षी, गवताचे तुरे, पानांच्या शिरा यांच्या माध्यमातून बारीक पॅटर्न्स दिसतात तर शेडिंग हे जितेंद्रचे बलस्थान. तसेच अनेक कथा व कवितांची चित्रे त्या त्या लेखक व कवींनी काढलेली आहेत. अशा ठिकाणी चित्रांखाली नावे नाहीत.

एकूणच शाळा, घर व समाजात आलेले अनुभव, मनातील इच्छा, भावना, जगाप्रतीची बनत असलेली समज या सर्वांचे प्रांजळ प्रतिबिंब मुलांच्या लेखन व चित्रांमध्ये आढळते व हीच नवनीतची ताकद आहे.


**मधुरा राजवंशी**

# पांढऱ्या पेशी

आयान मुलाणी
इ. २ री

गेल्या आठवड्यात मला रोज ताप येत–जात होता. म्हणून आमच्या येथील साळुंखे डॉक्टरांनी रक्त लघवी तपासायला सांगितले. मग माझ्या पप्पांनी फडे हॉस्पिटलमध्ये माझे रक्त, लघवी तपासले. माझा रिपोर्ट आला. त्या रिपोर्टमध्ये माझ्या पांढऱ्या पेशी वाढल्या होत्या. २१,७०० पांढऱ्या पेशी झाल्या होत्या. बाकी सर्व रिपोर्ट चांगला होता. मग मला तुरंत गुरुवार दि. २६–२–२०१५ रोजी ॲडमिट केले. मला सलाईन लावली. मग सलाईनमधून रोज दोन वेळा तीन प्रकारचे इंजेक्शन सोडत होते. मला चार दिवस ॲडमिट केले होते. सलाईनमुळे माझा हात दुखत होता. हे पाहून माझी मम्मी रडत होती. तेथे माझा एक मित्र झाला होता. त्याचे नाव सार्थक होते. त्याला टायफॉइड झाला होता. आम्ही दोघे खूप मस्ती करत होतो. मग माझे रक्त परत तपासले. तेव्हा माझ्या पेशी कमी झाल्या होत्या. मग मला घरी सोडले. मी सोमवार दि. ३–३–२०१५ रोजी शाळेत गेलो. मला शाळेची खूप आठवण येत होती.


■



# दादाचे ऑपरेशन

शरयू माने

इ. २ री





माझा दादा शाळेतून आला तेव्हा त्याच्या पोटात दुखत होते. त्याला थंडी वाजत होती. मम्मी त्याला दवाखान्यात घेऊन गेली. डॉक्टरांनी तपासून औषधे दिली तरी त्याला दोन दिवस बरे वाटत नव्हते. मला वाईट वाटायचे. त्याचे दुखते म्हणून तो सारखा झोपायचा. मी त्याला पाणी आणून द्यायची. त्याला चालताना धरायची. डॉक्टरांनी सोनोग्राफी केल्यावर सांगितले अपेंडिक्स आहे व ऑपरेशन करायला लागेल. माझ्यापण पोटात दुखत होते तेव्हा माझेपण ऑपरेशन झाले. म्हणून मला दादाची काळजी वाटत होती. दादाला ऑपरेशनची भीती वाटत होती. आपल्याला जागे ठेऊन पोटाला चीर देऊन

त्यातून अपेंडिक्स काढणार. मग मी सांगितले की डॉक्टर आपल्याला झोपायचे इंजेक्शन देतात आणि आपण झोपले की ते ऑपरेशन करतात. मग आपल्याला दुखत नाही. मग दादा ऑपरेशनला हो म्हणाला. मग तो म्हणाला आपण पटकन ऑपरेशन करू कारण माझे पोट दुखतेय म्हणून मला आंबे खाता येत नाहीत. माझ्या आवडीचे मला खाता येत नाही. दादाला मम्मी डॅडी पुण्याला घेऊन गेले. आणि ऑपरेशन केले एका दिवसात. त्याला घरी आणल्यावर मी विचारले की तुला दुखले का? तर तो नाही म्हणाला. दादाला पण माझ्यासारखा कॉस्मेटिक ग्लू लावला होता. त्यामुळे त्याला टाके घालावे लागले नाही. अशा प्रकारे दादाचे ऑपरेशन झाले. मला बरे वाटले.

---

## टर टर


वर्गात डस्टर
घरात लाइटर



दवाखान्यात सिस्टर
बाबांची स्कूटर


शेतात ट्रॅक्टर
चहा सोबत बटर

हॉटेलमध्ये वेटर
दुधाचे माप लिटर



रंगवणारा पेंटर
ऑफिसमध्ये कॉम्प्युटर

शाळेत मास्टर
कापण्यासाठी कटर



लाईटचा मीटर
थंडीत स्वेटर

**शरयू माने, अनुष्का धायगुडे**
**२ री**

# जत्रा

**महेश भिसे**

**इ. ३ री**

आमचे भिवाईचे देव आहेत. तसेच बनातली आई, धुळूबा, म्हस्कोबा असे काही देव आहेत. भिवाईची जत्रा होती. जत्रेत खूप गर्दी होती. देवळापाशी एक नदी आहे. तिचे नाव निरा नदी आहे. ती खूप खोल आहे. तिथेच नदीच्या पलीकडे एक छोटे देऊळ आहे.

जत्रेला खूप लांबून लोक येतात. आलेली माणसे नदीतून पोहून भिवाईच्या मंदिरात जातात. मंदिरात खूप गर्दी होते.

भिवाईला नवस बोलतात. माझ्या घरातल्यांनी नवस बोलला होता. तो नवस माझ्या दादासाठी केला होता. नवस होता म्हणून जत्रेला त्याला परडीत बसवून नदीतून फिरवून आणले. जत्रेत नवस म्हणून लोक कोंबडे, बकरी कापतात व नवस फेडतात.

जत्रा पाच दिवस असते. जत्रेला माणसांची खूप गर्दी आणि चेंगराचेंगरी होते. जत्रेत खेळणी, भांडी, नारळ, गुलाल, देवीचा पोशाख विकायला येतात. जत्रेसाठी प्रत्येकाच्या घरी पाहुणे येतात. जत्रा झाल्यावर जातात. आमच्या भिवाईच्या जत्रेला खूप खूप मज्जा येते. ■

---



## माकड

एक होते माकड  
त्याने खाल्ले पापड  
पापड खातो कुरुम कुरुम  
उड्या मारतो धडाम धुडुम  
मारतो कोलांट्या उड्या  
बांधल्या त्याच्या हाताला कड्या

**तनिष्का मदने**  
**३ री**


# गोलूची गोष्ट

**नूतन सूर्यवंशी**
**इ. १ ली**

माझ्या आजीने मला एक मांजर आणून दिले होते. त्या मांजराचे नाव मी गोलू ठेवले होते. गोलू खूप छान होता. त्याचा रंग पांढरा शुभ्र व त्याच्या अंगावर काळे ठिपके होते. गोलू माझ्याबरोबर पकडापकडी खेळायचा. माझ्या पप्पांच्या पायावर चढायचा.

एका दिवशी मम्मी लवकर उठली व दरवाजा उघडला व बाहेर गेली.मम्मीच्या मागोमाग गोलू पण बाहेर गेला. काम करून मम्मी आत आली. मम्मीला वाटले की गोलू तिच्या मागोमाग आत येईल. परंतु त्याला कुत्र्यांनी पकडून नेले. मम्मी खूप घाबरली. मी व पप्पा झोपलो होतो. तिने आम्हाला उठवून सांगितले की गोलूला ४ कुत्र्यांनी तोंडात धरून पळवले. मला खूप खूप रडू आले. मला समजले आपला गोलू गायब झाला आहे. मग मला दोन दिवस काहीच करमत नव्हते. मला गोलूची आठवण आजपर्यंत येत आहे. गोलू खूपच आगळा– वेगळा होता.

■



# वाघ दिसला

साक्षी कोळेकर

इ. ३ री

मी माझ्या आत्याच्या घरी इच्चलकरंजीला गेले होते. जाताना मला शिवथरच्या पुलापाशी एक बोर्ड दिसला. त्या बोर्डवर लिहिले होते की पुलाच्या नंतर वाघ फिरत आहेत! सावधान रहावे! आम्ही नंतर आत्याच्या घरी पोहचलो. तो बोर्ड वाचल्यापासून माझी खूप घाबरगुंडी उडलेली होती. आत्याने पप्पा, मम्मी, काका, काकूला पाणी दिले. आत्या मला पाणी देत होती. ती म्हणाली, "पाणी घे ना." मी म्हणाली, "नको." नंतर पप्पांना कळाले की मी खूप घाबरलीये. पप्पा म्हणाले, "तू का घाबरलीये?" मी म्हणाले, "पप्पा मी रस्त्यावर एक बोर्ड पाहिला." ते म्हणाले, "मग काय झाले त्या बोर्डवर काय लिहिले होते?" मी सर्व काही सांगितले. पप्पा म्हणाले, "हे काही खरे नसते."

आम्ही आत्याच्या घरून निघालो. मी अगोदरच घाबरली होते व अचानक पिवळा धम्मक अंगावर काळ्या पट्ट्या असणारा वाघ आमच्या गाडीसमोरून गेला.मी इतकी घाबरलेली की मला काही सुचेना. मी पप्पांना सांगितले," बघा तुम्ही म्हणालेला हे सर्व खोटे असते. आता बघा तुमचेच खोटे निघाले." मम्मी, पप्पा, काका, काकी सर्व म्हणाले, "तुझेच खरे." त्यांच्याही अंगावर शहारे आले.

## 'ळी'ची कविता



एक होती आळी
ती होती काळी
तिच्या नाकावर होती गोळी
तिने खाल्ली पोळी
तिची मैत्रीण कोळी
तिच्याकडे होती झोळी
त्यात होती केळी
आळी, काळी, गोळी, पोळी, कोळी, झोळी, केळी
अशी झाली शब्दांची खेळी

सिध्दी जगदाळे
२ री

# माय-लेकी

धनश्री शहा, कल्याणी पवार
इ. ३ री

एक गाव होते. त्या गावात लक्ष्मीबाई नावाची बाई राहत होती. तिला एक लेकरू होतं. तिचं नाव जना होते. त्या दोघी खूप गरीब होत्या. लक्ष्मीबाई सतत वावरात राबत असे. पिकलेल्या भाज्या बाजारात नेऊन विकून आलेल्या पैशात त्या पोट भरवयाच्या.

एके दिवशी त्यांना लई पैसे मिळाले. मग त्यांनी छान ज्यावण करायचे ठरवले. कालवण, भाकर, झुणका, भात करायचे ठरले. त्यांनी स्वयंपाकाला सुरुवात केली. लक्ष्मीबाईनी जेवण ताटात वाढले. दोघी पोटभर जेऊन झोपी गेल्या. झोपल्यानंतर जनाला एक सुंदर स्वप्न पडले. की ना त्यांचा मोठा बंगला आहे. बाहेर खूप मोठे अंगण आहे. घरात नोकर आहे. घरात टी.व्ही. आहे. मोठ्या गाड्या आहेत. भरपूर सोने आणि पैसे व मोठे मोठे दागिने आहेत. असे हे सपान जनाला पडले होते.


जना झोपेतून दचकून उठली आणि आईला म्हणाली की आपला बंगला व सोने व पैसे व अंगण व टी.व्ही कोठे गेले? आई म्हणाली की कसला बंगला, कसले सोने, कसले पैसे, कसले अंगण, कसला टी.व्ही? मग जनाला कळले हे सपान आहे.

■



# खंडूने वाचवले

अमित कदम
इ. ५ वी



मी तिसरीत असताना  घडलेला प्रसंग. ऐका तर... त्यावेळी मी खूप लहान होतो. एकटाच एसटीतून प्रवास करायचो. काय करावं, त्यावेळी आम्ही खेड्यात राहायचो. शाळेत जाण्यासाठी एसटीतून प्रवास करायला लागायचा. एका वेळी माझी एसटी चुकली मग मी दुसऱ्या  एसटीत  बसून गिरवीला गेलो.

वेळ दुपारची होती. गिरवीत पोहचलो. मेन रोडने जावे तर कुत्र्यांची भीती. कच्च्या रस्त्याने गेलो तर लांडग्यांची भीती. मी कच खाल्ली नाही, कच्च्या रस्त्याने गेलो. म्हणजे बघा एवढासा मी, धाडस केवढं मोठं! तर आता काय घडलं बघा...

हळूहळू चाललो होतो. समोरून सर्रर दिशी साप गेला. खूप घाबरलो तरी पुढे चाललो. भूक खूप लागलेली. जिथे बघावं तिथे गवत. त्यात हा पावसाळा .

आता खरी गंमत काय झाली बघा.......

(पान २४ वर)

# आजी

**तस्मिया मोमीन**
**इ. ५ वी**

माझी आजी फार प्रेमळ, मनाने निर्मळ, स्वभावाने शांत. ही माझ्या घरातली माझी सर्वात आवडती व्यक्ती आहे. तिच्यामुळेच मला घरी करमते. मला असे वाटते की तिच्यासारखी प्रेमळ आजी सर्वांनाच मिळावी. ती रोज मला तिच्या लहानपणीच्या गोष्टी सांगत असते. ती म्हणते, पूर्वीच्या काळी सातवी झाल्यानंतर शिक्षक होत असत. आणि आमचे शिक्षक आम्हाला अभ्यास देऊन पत्ते खेळायला जात असत. पूर्वी मुलींना शिक्षणाचा अधिकार नव्हता.

मी आत्तापर्यंत आजीला पाहत आले आहे तिने कधीच कोणाला दुखवले नाही. मला असे वाटते की तिला शिक्षणाची खूप आवड आहे. कारण ती जेव्हा आमचा अभ्यास घ्यायची तेव्हा ती इतकी आनंदी व्हायची व त्याच्यात मग्न असायची की तिला कशाचेच भान नसायचे. ती एकदा मला म्हणाली होती की मला शिकण्याची, काहीतरी बनण्याची इच्छा होती. पण त्या काळी माझी परिस्थिती नाजूक असल्याने मला शिकायला मिळाले नाही. पण आता तू शिकून काहीतरी बन. ■

---

## बारिश आई बारिश आई

बारिश आई बारिश आई
छम-छम-छम।
छाता लेके निकले हम।
बारिश में फिसलकर
गिर गए हम
उपर छाता।
नीचे हम।।



**जिया मोमीन**
**२ री**


# नकली हाडळ

अभय जाधव
इ. ५ वी

ती रात्र होती अमावस्येची. आम्ही घरातले सर्वजण एसटीतून गिरवीजवळील वारूगडला चाललो होतो. रस्त्यावर दूरदूरवर एकही घर नाही, रस्त्याला एकही लाईटचा खांब नाही. सगळीकडे एसटीच्या प्रकाशाव्यतिरिक्त काही प्रकाश नाही. सर्वत्र अंधारच अंधार. सगळे गप्प, फक्त एसटीचा आवाज. तेवढ्यात एसटी बंद पडली. सर्वांची चर्चा सुरू झाली. सर्व म्हणायला लागले की भुतामुळे गाडी बंद पडली. एसटी चालक बाहेर पडला. त्याने त्याच्या मोबाइलची लाइट चालू केली. इंजिन उघडून पाहिले तर इंजिन जसे असते तसेच होते. हळूहळू वेगवेगळे आवाज येऊ लागले. घाटातून हळूहळू पांढऱ्या साडीची बाई आली. सर्वजण उतरून तिच्याकडे पाहत होतो. तिने मान खाली घातल्यामुळे व केस पुढे डोक्यावर सोडल्यामुळे ती हाडळच वाटत होती. पण तिची सावली पडत होती.


अचानक विजा कडकडायला सुरुवात झाली. तेव्हा सर्वजण अजूनच घाबरले. ती जवळ आली तेव्हा मी तिचे निरीक्षण केले. मग तिने डोके वर काढले व म्हणाली, ''मला

(पान २८ वर)



# आदित्यचा दवाखाना

सोहम दोशी
इ. ५ वी




एका गावात एक कुंभार राहत होता. त्याचे नाव गणेश होते. त्याला एक मुलगा होता. त्याचे नाव आदित्य. गणेश खूप सुंदर सुंदर मडकी, भांडी बनवायचा. व ही भांडी तो बाजारात विकायचा. त्याला त्याचे पैसे मिळायचे पण...पुरेसेच. एवढे पैसे कमवायलासुध्दा गणेशला खूप कष्ट करावे लागायचे. यावेळी आदित्य ५ वीत शिकत होता. तो खूप हुशार होता. त्याचे पप्पा म्हणजे गणेश त्याला रोज म्हणायचे की तू हा व्यवसाय अजिबात करू नकोस. यात काम जास्त व पैसे कमी मिळतात. म्हणून तू हा व्यवसाय न करता दुसरा काही मोठा व्यवसाय कर. आदित्यचेसुध्दा हेच ध्येय होते. (पान २६वर)

# जंगल समस्या: एक स्वप्न

रुपल पाटोळे
इ. ५ वी

एकदा मित्रांनो, मला एक असं स्वप्न पडलं, की जे सर्वांना पटेल. जंगलात महत्वाची मीटिंग चालू होती. तीही रात्री. असे कोण असेल, जो रात्री, तीही जंगलात मीटिंग करेल? तो कोण माणूस तर नव्हताच. तर प्राणी चर्चा करीत होते.एकमेकांसंगे बोलत होते. साक्षात वनराजही तेथेच एका काळ्या पाषाणावर बसले होते. मग चर्चा सुरू–

वनमंत्री : महाराज, मला वाटते या माणसांना आपण धडा शिकवावा. वृक्षतोड करतात, दंगली करतात. जंगले उध्वस्त करतात. आता तर मी ऐकलयं शेतकरी आत्महत्या देखील करतात. हे सर्व झाल्यावर एकच प्रश्न विचारतो– कोणाला काही झालं का? लागलं का? आपण पडो नाहीतर मरो! त्यांना त्याचं काय? मला वाटतं त्यांना अद्दल घडवली पाहिजे.

मोर : मला असं नाही वाटत मंत्री जी! आपण त्यांना एक संधी अजून द्यावी वनराज. निघेल काही मार्ग.

वनराज: नाही! या माणसांना अद्दल घडायला हवी. आपली जंगले उध्वस्त करतात ते! मग अन्नपाणी संपल्यावर आपण त्यांच्याकडे अन्न शोधायला गेलो की आपल्याला मारतात. पण आपला तसा हेतू नसतोच, मग आपल्याला राग येणारच.

हत्तीदादा: महाराज, मला वाटते आपण आपल्या बाजूने विचार करताय.चर्चेत दोन्ही बाजू समान असायला हव्यात.

वनराज: हत्तीदादा बरोबर बोलताय! पण केवळ शोसाठी ते आपल्याला मारतात. आपले दात काढतात. नखे काढतात, हे योग्य आहे?

ससोबा: बरोबर बोलताय आपण! पण आपण किती, ते किती! आपण त्यांना काही करू शकत नाही. त्यापेक्षा गप्प बसा. डोके चालवा.

वनराज: (रागात) ससोबा, गप्प बसा! तुम्ही या वनराजाला म्हणताय डोकं चालवा म्हणून? डोकं ठिकाणावर आहे का? डोकं तर तुम्ही चालवा! याची शिक्षा तुम्हाला मी करू शकतो बरं!

घोडा: वनराज, आपण म्हणत असाल तर मी घोड्यांचं सैन्य तयार करतो. उंदीरमामा माणसांच्या घरी घुसतील व सामान कुरतडून त्यांचे मोठे नुकसान करतील. कोल्हेदादा व गाढवराव त्यांच्या शेतामध्ये घुसून त्यांचे शेत भुईसपाट करतील. वनराज, आपण व हिंस्त्र प्राणी माणसांवर हल्ला कराल. हत्तीदादा आपण झाडे तोडाल व जिराफराव पानाफुलांची नासधूस करतील.

वनराज: चला तर मग, वाट कशाची पाहता?


सर्व निघाले. शहरापाशी ते पोहचणार, इतक्यात मोठं वादळ आलं, पाऊस पडायला लागला. मी मनात घाबरले व उठले. बघते तर आई उठवत होती. मी उठले व शाळेत जायची तयारी केली. मी माझे स्वप्न आईला सांगितले. तिला ते पटले व इतर सर्वांनाही पटले. तुम्हालादेखील ते पटले असेलच. या स्वप्नातून मी एक चांगला धडा घेतला. आपण आपल्या बाजूने विचार करतो पण त्या मुक्या जनावराचं काय? मानवाचा मेंदू सर्वात मोठा ना? मग त्याचा वापर चांगल्या कामासाठी का नाही करू शकत मानव? तेव्हा प्रथम आपण सुधारू! मग इतरांकडे बोट दाखवू.

■



# हमने बनाया किला

**आनम शेख**
**कक्षा ५ वी**



हम सब गली में के बच्चे एक जगहपर इकट्ठा हुए। फिर हमने सबको काम बाँटकर दिए। फिर हमें भैय्या ने कहा, तू और सलमा मिट्टी लाने के लिए जाओ। हम मिट्टी ढूँढने के लिए साइकिल पर निकले। पर हमें कहीं पर भी नहीं मिली। फिर हमारे दिमाग मे आया कि लाल मिट्टी रायगड हॉटेल के यहाँ पर मिलेंगी। हम वहाँ गये। हमें वहाँ पर लाल मिट्टी मिली।

तबतक अम्मारा और फिजा ने पत्थर इकट्ठा किए। फिर हम सबने वो एकपर एक रचाए। फिर मिट्टी में थोडा पानी डालकर मिट्टी का कीचड बनाया और उसे पैर से तुडाया। फिर वो किचड को पत्थरों पर थोपा और फिर किले पर सीढियाँ बनाई। किले के नीचे दो गुफाएँ बनाई और सामने तालाब बनाया। किले के बाजू में खेत बनाया और दूसरे साईड मे चंगू-मंगू का कुस्ती का मैदान बनाया। खेत में गेहूँ, चावल और राई का पीक लगाया। और किले पर भी राई डाली।

तालाब मे पानी डालकर उसमें थर्माकॉल


के छोटे छोटे गोले डाले और उसमें एक बडा बत्तख तालाब के पास पत्थर पे रखा। उसके बच्चे पानी में तैर रहे थे ऐसा दिखाया। किले के उपर सलाईन की आढी बॉटल लगाकर, उसमें पानी डालकर उसे बिळ गिराया और फव्वारा तयार हुआ। किले पर सैनिको का पेहरा किया और ऊपर शिवाजी महाराज बिठाए। किले के सामने हॅप्पी दिपावली लिखकर उसे साईड से सजाया। ऐसा हमने सबने मिलकर बडा किला बनाया।

---

## बाजार

बाजारात साऱ्या वस्तू उघड्यावर
सारा व्यवहार रस्त्यावर
घेणाऱ्याची असते घाई
आई म्हणते, कितीला आहे बाई?
घ्या वो ताई भाज्या ताज्या
म्हणते आई, घरी आहे माझ्या.

यशवर्धन वाळा
७ वी



# आजोबांचा वाढदिवस

**शिवांजली ढेंबरे**

**इ. ६ वी**

मला तो दिवस अजून लक्षात आहे. माझ्या पप्पांना सुट्टी मिळत नसल्याने आम्ही कुठे फिरायला जाऊ शकलो नाही. आणि मतदानामुळे माझ्या बहीण-भावंडांना खूप उशिरा सुट्ट्या लागणार होत्या. त्यामुळे शिंदेवाडीला अजून कोणीही आले नव्हते. मला खूप बोअर होत असल्याने आम्ही २-३ दिवसांनी अथवा एक दिवसाआड फलटणला यायचो.

आम्ही फलटणला आल्यावर आमचा चल्लस-आठचा डाव चालायचा. त्या दिवशीही असाच डाव चालला होता. आणि तेवढ्यात पप्पांचा फोन आला. आईने फोन उचलला. पप्पा म्हणत होते, ''मला बँकेत घर बांधण्याच्या कामासाठी जायचं आहे. त्यासाठी कुणालने घराचा उतारा व काही महत्त्वाची कागदपत्रे एका फाईलमध्ये ठेवली आहेत. त्यावर कुणाल अशोकराव माने असे नाव आहे. आई म्हणाली ठीक आहे मी शोधून ठेवते. आणि आईने फोन ठेवून दिला.



तिने माझ्या आजीला फाईल शोधायला लावली. आजी म्हणाली, "फाईल सापडेना." आई म्हणाली, "असं कसं? तो वरचा कप्पा काढ."

आजीने वरचा कप्पा काढला. त्यामुळे आमचा चांगला रंगत आलेला डाव थांबला. सगळे ती फाईल शोधू लागले आणि शेवटी ती फाईल सापडली. आजी ती फाईल एका पिशवीत ठेवत होती. तेवढयात आईला एक डायरी सापडली. त्यात माझ्या मोठ्या व लहान मामांची जन्म तारीख लिहिली होती तसेच माझ्या पणजोबांनी माझ्या आजोबांची जन्म तारीख २/६/१९५३ अशी लिहिली होती. तेव्हा आईच्या डोक्यात आयडिया आली. तिने सगळ्यांना सांगितले की आपण आजोबांचा वाढदिवस साजरा करू, पण हे आजोबांना कोणी सांगायचे नाही बरे का! सगळे हो म्हणाले.

सगळ्यांनी काय काय आणायचे ते वाटून घेतले. छोटा मामा केक आणणार होता. आई, मी व पप्पा आजोबांना एक ड्रेस आणणार होतो. ठरल्याप्रमाणे आम्ही आजोबांना काही सांगितले नव्हते. आम्ही शिंदेवाडीहून आलो व ५.३० वाजता आजोबांना ड्रेस आणायला गेलो.

आम्ही घरी आलो तेव्हा आजोबा घरीच होते. त्यांना मी त्यांचे नवीन कपडे आणलेले दिले व घाला असे म्हणालो.

"काय आहे त्यात?" त्यांनी विचारले.

"काढा आणि बघा." मी म्हणालो त्यांनी ते पाकीट उघडले. "हे का आणलं व कोणासाठी?" त्यांनी विचारले.

"तुमच्यासाठी. कारण तुमचा आज वाढदिवस आहे."

"काय?"

"हो."

"चला आता केक कापा." आई म्हणाली.

आजोबांना खूप आश्चर्य वाटले. त्यांना आम्हाला प्रश्न विचारायचे आहेत असं स्पष्ट दिसत होतं. पण आधी त्यांनी केक कापला. जराशी क्रीम आम्ही एकमेकांच्या चेहऱ्याला लावली. आजोबांच्या वाढदिवसाची मेजवानी खूपच छान होती. आम्ही जेवलो. आणि त्यांच्या मनातले प्रश्न विचारायला त्यांनी सुरुवात केली. "तुम्हाला कसं कळले की आज माझा वाढदिवस आहे?"

मी जे घडलं ते सांगितले.

"हो? असं झालं का?" ते म्हणाले.

"हो."

त्या दिवशी खूप पाऊस पडत असल्याने आम्ही फलटणलाच राहिलो. मला, आजोबांना आणि सगळ्यांनाच आजोबांचा वाढदिवस खूप आवडला.

■

# रेल्वेची करामत

**प्रसाद थोरात**

**इ. ६ वी**

आम्हाला दिवाळीची सुट्टी लागली. भाऊबिजेच्या दुसऱ्या दिवशी श्रीरामपूरला जायचे होते.

रविवारी सकाळी साडेसात वाजता फलटण बसस्थानकावर आलो. लगेच बारामती गाडी लागली. आम्ही बारामती बस स्थानकावर पोहचलो. तेवढ्यात धो धो पाऊस सुरू झाला. आम्ही रिक्षामध्ये बसेपर्यंत ओलेचिंब झालो. रेल्वे स्टेशनवर मी तिकिटघरात गेलो, तर हे मोठी लाइन लागलेली! माझा पन्नासावा नंबर. तोपर्यंत मी विचार केला की दौंडला दुसऱ्या रेल्वेचे तिकिट काढणे म्हणजे दोन दादरे चढायचे, उतरायचे व रांगेत उभे राहायचे. म्हणून मी डायरेक्ट बारामती ते बेलापूर तिकिट काढले. रेल्वे आली. आम्ही रेल्वेत बसलो. तेव्हा साडेनऊ वाजलेले. आम्ही बारा वाजता दौंडला पोहचलो.

आता दौंड-हैद्राबाद रेल्वेची वेळ झाली होती. गर्दी खूप होती. आम्ही म्हणालो जागा भेटते का नाही? तेवढ्यात रेल्वेची अनाउन्स्मेंट झाली- '९०१४५ दौंड-मनमाड-हैद्राबाद फास्ट पॅसेंजर गाडी आपल्या निर्धारित वेळेपेक्षा दोन तास उशीरा येणार आहे. धन्यवाद.' आम्ही म्हणालो, जाऊ दे दोन तास तर लेट आहे. आम्ही जेवण केले. तेव्हा एक वाजला होता.

मी व दिदी इकडून तिकडे फेऱ्या मारत होतो. दोन वाजले. परत सांगितले गाडी दीड तास लेट आहे. आम्ही डोक्याला हात मारला. दिदी व मी सारखे फिरत होतो. आम्हाला काही काम नसल्यामुळे या प्लॅटफॉर्मवरून दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर जायचो. आम्ही दोघांनी गाड्यांची नावेदेखील वहीत लिहिली. पाच मिनिटाला एक गाडी गेली की दुसरी हजर.

तीन वाजले. आम्ही परत प्लॅटफॉर्म पाच वर आलो. थोडा वेळ बसलो. साडेतीन वाजता परत सांगितले की गाडी अडीच तास लेट आहे. आम्ही परत बसून राहिलो. आम्हाला मामीचे भाऊ भेटले. त्यांनाही चाळीसगावला जायचे होते. ते त्यांच्या दुसऱ्या बहिणीकडे आले होते. ते खूप कॉमेडी होते. आम्हाला तेवढाच तीन तास टाईमपास सापडला.


आता साडेसहा वाजले तरीही पत्ता नाही रेल्वेचा. सात वाजले. परत सांगितले रेल्वे गाडी नऊ तास लेट आहे. कारणसुध्दा सांगितले लेट होण्याचे. गाडीचे मागचे दोन डब्वे मनमाड मध्ये जळले. तिथे पाच तास गेले. व एक बाबा आत्महत्या करत होता तेवढ्यात रेल्वे

थांबली. तिथे तीन तास गेले. व बाकीचे तास क्रॉसिंगला गेले. पुण्याला दोन तास थांबली, व अडीच तास कोपरगावला थांबली. व औरंगाबादला दीड तास थांबली,

रात्रीचे दहा वाजलेले. गार लागायला लागले. आम्ही स्वेटर घातले व परत फिरू लागलो. असे करत करत पहाटेचा एक वाजला. आम्हाला झोप आलेली पण तेथे सारखी चोरी होते म्हणून आम्ही जागेच होतो. त्या जंक्शनवर फक्त दोन कुटुंबे होती. एक आमचे व प्लॅटफॉर्म २ वर एक. आता साडेतीन वाजले होते. थोडी गर्दी झाली. एकदाची रेल्वे आली व लगेच हलली. एक्सप्रेस रेल्वे सारखी धावली. एरवी दौंड ते श्रीरामपूर रेल्वेला आठ तास लागतात पण त्या दिवशी चार तासात श्रीरामपूर गाठले.

पण रविवारी श्रीरामपूरला पोचायचे ते आम्ही सोमवारी पोचलो!

■



# नानी माँ ओ नानी माँ

नानी माँ ओ नानी माँ
बात हमें बतलाओ ना।

क्यों छोटा बच्चा है रोता?
बारह-तेरह घंटे सोता?
हररोज चार कपडे बदलता?
ये बात हमें बतलाओं ना,
नानी माँ ओ नानी माँ।

ये दुनिया क्यों है गोल?
रस्ते पर क्यों लिया जाता टोल?
चूहे के घर को होता है एक होल?
ये बात हमें बतलाओ ना,
नानी माँ ओ नानी माँ।

इन्सान क्यों नहीं करता दुनिया को रोशन?
हमेशा क्यों करता है प्रदूषण?
भारत में क्यों चलता है भ्रष्टाचार का
राजकारण?
ये बात हमें बतलाओ ना,
नानी माँ ओ नानी माँ।

गायत्री शिंदे, रुचिका कुंभार,
प्रतिक काकडे, ऋतुराज कुंभार
स्नेहा काकडे
कक्षा ६ ठी

---


**खंडूने वाचवले (पान १२ वरून)**

झाडाच्या पुढे दोन लांडगे. मी इतका घाबरलो की मी थरथर कापू लागलो. झाडाआड दडून बसलो. लांडग्यांनी मला बघितलं तेव्हा ते हळू हळू चालू लागले. मग आलं आमच कुत्रं खंडू. भुंकून भुंकून लांडग्यांना हाकललं त्याने. घरी गेलो, सगळं सांगितलं. मग जेऊ लागलो. इनाम म्हणून खंडूला भाकरीचा काला करून दिला. आणि मी खूप आनंदी झालो!

■

# मधली सुट्टी

## चिन्मया कुमठेकर
## इ. ७ वी



शाळेचे रोजचे तेच तेच पाच सहा तास. खूप कंटाळा येतो नाही! पण आम्हाला तो कंटाळा घालवायला अर्ध्या तासाची सुट्टी असते. ती म्हणजे मधली सुट्टी. मधली सुट्टी झाली की सगळ्यांना बाहेर पळायची घाई झालेली दिसते. आमच्या ७ वी च्या वर्गाजवळील दुसऱ्या वर्गातील म्हणजे ४ थी ची मुले आम्हाला धक्का देऊन रांग करायला जोरात पळत असतात. ती छोटी छोटी मुले धक्का–बुक्की करत रांग करत असतात. आम्ही आता मोठे झालो आहोत पण आम्हीदेखील अशीच मज्जा म्हणून अशा छोट्या–मोठ्या खोड्या करत असतो.

मधली सुट्टी झाली की कधी त्या वर्गातून बाहेर पडतोय असं होतं. पण आम्ही जरी घाईने डेटॉल घेतलं तरी त्या नळावर मात्र धांगडधिंगा असतो. खूप गर्दी! कधी मला नळ भेटतोय असं होतं. पण कधी कधी तर डेटॉलही भेटत नाही. कारण नखं कापायचा केलेला कंटाळा. मग घाईघाईने नखं कापायची. कधी कधी

तर उशीर व्हायला नको म्हणून आम्ही मधल्या सुट्टीच्या आधीच्या तासाला नखं कुरतडत बसतो.

मुलींच्या 'तू डब्यात आज काय आणलं आहेस' अशा गप्पा चालतात. पण मुलगे मात्र हात धुऊन डबा खायला पटकन पळतात. आम्ही हॉलमध्ये पोहचेपर्यंत त्यांचा डबा अर्धा झालेला असतो. कधीकधी तर संपलेलासुध्दा असतो. आम्ही मात्र सावकाश आरामात जेवतो. मुलगे भरभर डबा खाऊन खाली खेळायला पोहचतात तेव्हा आम्ही मुली ग्रुप करून भाज्या एकमेकांना देत असतो. एरवी घशाखाली न उतरणारे कोबी, मुळा, कारलं कधी संपतात हे कळतदेखील नाही. गप्पा मारत सगळं खाल्लं जातं. डबा चाटून पुसून संपतो. मैत्रिणींसोबत रोजचा बटाटादेखील आवडतो.

जेवण झालं की नळावर पुन्हा मज्जा असते. एकमेकींच्या अंगावर पाणी उडवत. अशीच आमची ५ मिनिटे जातात. मग उरलेली १० मिनिटे पुन्हा गप्पा. काल सिरियलमध्ये काय झालं, पुन्हा घरच्या काही गमती-जमती सांगत बसतो.

कधी कधी आम्ही विचित्र खेळ खेळत बसतो. या सगळ्यात आमची भांडणेदेखील होतात. पण ती फार काळ टिकत नाहीत. पुन्हा कधी बोलतोय असं होतं. उगाच भांडलो असं वाटतं.

इतक्या सगळ्या गोष्टी असतात की ही अर्ध्या तासाची मधली सुट्टी आम्हाला पुरतच नाही!

■

---

आदित्यचा दवाखाना (पान १५ वरून)

थोड्या वर्षांनी तो मोठा झाला.डॉक्टर बनला. त्याने दवाखाना काढला. पण त्या काळी पूर्वज जे काम करत होते तेच काम त्यांच्या मुलांनी करावे हा नियम होता. आणि आदित्यने कुंभाराचे काम न करता दवाखाना काढला त्यामुळे उच्चवर्णीय लोकांनी तो फोडला व त्यांना वाळीत टाकले. मग आदित्यने त्याच्या वडिलांना सांगितले की तुम्ही आता मडकी बनवून विकू नका.

तो ऋतू होता उन्हाळ्याचा. त्यामुळे लोकांना थंड पाणी हवे होते. म्हणून लोक गणेशकडे मडकी मागायला येऊ लागले. पण गणेश मडकी कोणालाही देत नव्हता. मग लोकांनी गणेशला मडकी न विकण्याचे कारण विचारले. गणेश म्हणाला, "तुम्ही आम्हाला वाळीत टाकले. माझ्या मुलाचा दवाखाना फोडला, आम्हाला नीच समजले, का तर आम्ही कुंभार आहोत. मग आम्ही का मडकी तुम्हाला देऊ?" यावर लोक म्हणाले, "आमचं चुकलं. आम्ही तुझ्या मुलाला नवीन दवाखाना बांधून देतो आणि आत्तापासून कोणाचाही मुलगा कोणतेही काम करू शकतो."


नंतर लोकांनी आदित्यला नवीन दवाखाना बांधून दिला. त्याचे आनंदात उद्घाटन केले. व ते गाव पुन्हा सुखाने राहू लागले.

# काव काव

सिद्धी शिरोळकर
इ. ७ वी

गौरीपूजनाचा दिवस होता. म्हणजे धामधूमच. हळदी-कुंकवाला सगळ्यांचे बोलावणे आले होते. अगदी लांबच्यांचे सुध्दा. कुमारिका म्हणून तीन-चार ठिकाणी जायचे होते. मी आपली खोलीत तयार होत होते. आईची व आजीचीही तयारी जोरात चालू होती.

एकदम कानावर कावळ्यांचा कर्कश्य आवाज आला. मी दार उघडलं. खूप कावळे त्या झाडावर दणदणीत आवाजात काहीतरी संदेश देतायत असे वाटत होतं. तेवढ्यात सिध्दी... सिध्दी... असा आवाज माझ्या कानावर पडला. पण मी दुर्लक्ष केले. परत आवाज आला. बघते तर उंडे ताई मला हाक मारत होत्या. त्यांनी मला सांगितलं की तुमच्या झाडावर एक कावळा पतंगाच्या दोऱ्यात अडकून जखमी झालाय.



मी पाहिले तर तिन्ही सांजेची वेळ होत आली होती, अंधार पडायला लागला तसा शे-दीडशे कावळ्यांचा एकच गलका जोरजोरात सुरू झाला. लांब काठी नाही, घरात बाबाही नव्हते. आई साडी नेसत होती. काय करू काही सुचेना.

त्यानंतर दोन मिनिटातच फाटकाचा धाड्कन आवाज आला. उंडे काका आणि उंडे ताई लांब काठी घेऊन आले होते. मी आईला गाजावाजा करत सांगत सुटले, 'ताई आल्या, ताई आल्या.' आई चटकन बाहेर आली. आमची झुंड उंडे काकांच्या मागे. उंडे काका आमच्या भिंतीवर चढले. फांदी चांगलीच उंच होती. खालून सांगत होतो, 'हा त्या त्या फांदीवर कावळा... इकडे...' त्यात कावळ्यांचा आवाज. खूप प्रयत्नांनी ती फांदी उंडे काकांच्या हाती आली अन् त्यांनी काठीनं त्याचा दोर ओढला. कावळा खाली आला तसे अनेक कावळे अंगावर आले. क्षणार्धातच मांज्यात अडकलेला कावळा मोकळा झाला अन् एकदम हवेत झेपावला. तसे त्याचे सगळे साथीदार त्याच्यामागे चिडीचूप उडून गेले. अन् तासाभराचा कालवा मिनिटातच शांत झाला.

■

---

**नकली हाडळ (पान १४ वरून)**

वारूगडच्या यात्रेत न्या. मी तुम्हाला काहीही करणार नाही." मी म्हणालो, "ए हाडळे!" ती म्हणाली, "तू चूप, मला हाडळे म्हणू नकोस. मला मोहिनी म्हण."

"मोहिनी, तू हाडळ आहेस ना?

"हाडळ म्हणू नकोस."

"बर पण हाडळे, तू हाडळ आहेस ना? पण ऐक तर, हाडळीकडे जादू असते. जादूने त्या कोठेही जाऊ शकतात."

मग ती बाई म्हणाली, "माझे लहानपणापासूनचे स्वप्न होते एसटीतून वारूगडला जायचे. ते पूर्ण झाले नाही म्हणून मी अशी बनले. तर मला वारूगडला न्या."

अचानक गाडी चालू झाली. सर्वजण गाडीत लगेच चढले. सर्वांसोबत मोहिनी (हाडळ) पण एसटीत चढली.

गाडी वारूगडला पोहचल्यावर मोहिनीने सांगितले की, "मी काही हाडळ नाही. मी साधी बाई आहे." तेव्हा कुठे सगळ्यांचा जीव भांड्यात पडला. मोहिनी म्हणाली, "माझे घर इथून जवळ आहे. काल रानात फिरताना मी भटकले होते. मगाशी वेगवेगळे आवाज येत होते ना ते कोल्ह्यांचे होते. ते माझ्या मागे लागले होते. मला थंडीपण वाजत होती. वाहन दिसले तर जायला पैसेही नव्हते. म्हणून मी असे केले. म्हणजे हाडळीची नक्कल केली. तुम्ही मला एसटीतून येऊ दिल्याबद्दल धन्यवाद!" सर्व हसायला लागले.

■

# भाकरी

**जिऊ निमकर**

**इ. ७ वी**

सोनाळ्यातील आमचे घर गावापासून अर्धा कि.मी. लांब आहे. अगदी वस्तीच्या बाहेर. त्यामुळे दुधासारख्या छोट्या छोट्या गोष्टी आणायलासुध्दा गावात जावे लागते. पण असेही नाही की खूप खेपा घालाव्या लागतात. कारण कोणीही गाडीवाले येणारे जाणारे असले की त्यांच्याबरोबर वस्तू आणल्या जातात.

दूध आणायला सकाळी ६.३० ला जावे लागते. मी तिकडे असले तर मी कधीतरी दूध आणायला जाते. आम्ही मोहन दादाच्या घरून दूध आणतो. मी पोहचते तेव्हा काकूंच्या चुलीवर भाकऱ्या चालू असतात. (गॅस असूनही त्या भाकऱ्या चुलीवरच का करतात हे मला अजूनही उमगलं नाहीये.)

मी आल्यावर त्या म्हणतात, "ये, बस. भाकरी आणि तूप खा!" मी विचार करायला लागते. सकाळी लवकर उठून आल्याने भूक लागलेली असते. मला विचार करताना बघून काकू हळूच म्हणतात, "खा गं. मी सांगते तुझ्या आईला." आणि ताटात गरमागरम भाकरी वाढतात. त्यावर तब्बल चार चमचे तूप ओततात आणि मला खायला देतात. मी चुलीजवळ शेक घेत भाकरी खाते. ती संपते न संपते तोच काकू आणखी भाकरी देतात. ती खाऊन झाली की मात्र पोट भरते. मग लक्षात येते की अजून अर्धा किलोमीटर चालायचे आहे. घरी पोहचल्यावर मात्र मी काही न खाता आवरून खेळायला पळते! ■



## महत्वपूर्ण बातें


लोहे में टाटा का, जूते में बाटा का
मार्केट में शेअर का बडा महत्व है।
रंग में गुलाबी का, भोजन में दाल का
संगीत में ताल का बडा महत्व है।

बारिश में चाय का, चुनाव में वोट का
दुनिया में नोट का बडा महत्व है।
खाने में अंडे का, दुनिया में संडे का
देश में झंडे का बडा महत्व है।

पृथ्वी पर सूरज का, फिल्मों में गानों का
क्रिकेट में विकेट का, बडा महत्व है।
वेस्ट इन्डीज में गर्मी का, अमरिका में काम का,
भारत में धर्म का बडा महत्व है।

गर्मी में शीत पेय का, चॅनल में दूरदर्शन का,
लॅपटॉप मे डेल का बडा महत्व है।
संगणक में पेंट का, पेंट में ब्रश का
ब्रश में रंगों का बडा महत्व है।

मोबाइल में सिमकार्ड का, इंटरनेट में गूगल का,
फेसबुक पर अकाउंट का बडा महत्व है।
इन्सान को कपडों का, कपडों के साथ जूतों का
जूतों के साथ सॉक्स का बडा महत्व है।



**रेहान आतार**
**कक्षा ८ वी**

# भंडारा

**ऋतिक माने**
**इ. ९ वी**

सुरवडीच्या जरा पुढे काळज हे गाव आहे. आम्ही मुक्कामाला गेलो नव्हतो. जत्रेदिवशी सगळी मुलं एस.टीतून काळजला गेलो. गाव आलं, एस.टी थांबली. आम्ही उतरून चालायला लागलो.

जत्रेत सगळी माणसं ओळखीची होती. आम्ही मित्राच्या पालाच्या शेजारी गेलो. गर्दी होती. म्हणून तमाशा बघाय गेलो. मित्र आला. म्हणाला की जेवण करून परत येऊ तमाशाला. हात पाय धुवून जेवायला बसलो. ताट समोर आलं की सर्वांच्या तोंडाला पाणी सुटलं. बोकडाचं कालवण–भाकरी होती. भात पण. पोरं निबार वडत होती. मीही खाल्लं, हात धुतला व उठलो. पोरांचं वडनं अजून चालूच होतं.

एकदाची पोरं उठली. परत तमाशा बघायला निघालो. चिचा पाडून झाल्यावर तमाशाकडे निघालो. बघत बघत बोअर झालं म्हणून शेजारच्या रानात गेलो. रान तसं मोठं होतं. रानात सगळा हरभरा होता. जाता जाता सगळ्यांनी हरभऱ्याची झाडं काढली. खायला सुरुवात झाली. हसत–खेळत हरभरा खात होतो. हरभरा संपला म्हणून अजून हरभरा उपटून खातच होतो. आम्हाला बघून शेतकरी वरडला. हरभरा तिथंच टाकून पळायला लागलो. तोपर्यंत शेतकरी दगडी घेऊन तानाय लागला. त्यामुळे मुलं पांगली. निम्मी हिकडं निम्मी तिकडं पळाली. मी एकटाच पळत मंदिराकडं आलो. तरी शेतकरी तानतच होता.

खंडोबाची पालखी बाहेर निघाली. पिवळा भंडारा उडाय लागला. शेतकरी मागं मी फुडं पळतच होतो. शेवटी मला दम लागला, पण शेतकरी काय थांबंनाच. मग भंडाऱ्यात शिरलो. सगळी माणसं पिवळा भंडारा उडवत होती. मी पण पार पिवळाच झालो. आता शेतकऱ्याला मी दिसत नव्हतो. सगळीच पिवळी झाली होती. शेतकऱ्याने तानायचं सोडलं. कडंला उभं राहून बघाय लागला. मग मी भंडाऱ्यातून बाहेर निघून फुडे निघालो. पण रस्ता माहीत नव्हता. एका माणसाला विचारलं,"बस स्टँड कुठंय? तो म्हणाला डाव्या अंगाला वळ." फुडं गेल्यावर दुसऱ्याला विचारलं, तर तो म्हणाला उजव्या अंगाला वळ. मला कायच कळलं नव्हतं. नेमकं कुठल्या साईटला जावं? मग मी सरळ गेलो. हिकडं तिकडं बघत अर्धा–एक तास चालतच होतो. एकदाचं बस स्टँड दिसलं. मी खूश झालो. एस.टीची वाट बघत बसलो. पण बस काय येईना. मग वडापमध्ये बसलो आणि घराकडं निघालो.

# माझ्या गाड्या

अर्चित परुळेकर
इ. ९ वी

लहानपणापासूनच मला गाड्यांची खूप आवड होती. मी बालवाडीत असताना चित्र काढायचो. आम्ही गावाला चाललो असलो की मला पुढे बसून गाड्या बघायला आवडायचे. कोणती नवीन गाडी बघितली की तिच्या कंपनीचे व मॉडेलचे नाव मी शोधत असे.

एकदा सातवीत असताना सरांनी कागदाच्या लगद्यापासून वेगवेगळ्या वस्तू बनवायला लावल्या. सर्वांनी फळे, ट्रे, भांडी यांसारख्या वस्तू बनवून आणल्या. मग माझ्या डोक्यात एक विचार आला की त्या लगद्याची आपण गाडी बनवली तर? मी लगदा भिजत घातला. त्या लगद्याची गाडीची दोन चाके व आख्खी बॉडी बनवली. ते सुकायला ठेवले व सुकल्यावर प्लायवुडने त्याची चाके व बॉडी फेवीक्विकने जोडली. नंतर त्याला ऑईलपेंट मारला. ती गाडी मी दुसऱ्या दिवशी शाळेत नेली. सरांना व मंजूताईंना ती खूप आवडली. त्या दिवशी आमच्या वर्गाची मीटिंग होती. त्यामध्ये त्यांनी गाडी ठेवली.

नंतर चार दिवसांनी माझ्या मनात एक कल्पना आली. माझ्या वडिलांचे गाड्यांच्या इंजिन रिपेअरिंगचे वर्कशॉप आहे. माझ्या डोक्यातील कल्पना अशी होती की इंजिनमधील निकामी पार्ट्समधून गाडी बनवायची. तशी कल्पना भन्नाट होती, पण करायला अवघड होती.

डोळ्यासमोर काढून टाकलेले गाडीचे पार्ट मोठ्या प्रमाणात होते. यातूनच मला गाडीचे मॉडेल साकारायला लागणार होते. पण एकदा ठरवले की माघार घ्यायची नाही. जुन्या गाड्यांच्या बेअरिंग, व्हाल्व्ह, रबरी बुश, स्लीव, गाईड, लाकडी फळी अशा पार्ट्समध्ये मला माझ्या नवीन गाडीचे पार्टस् दिसू लागले.

घरचे वर्कशॉप असल्यामुळे मला हत्यारांची कमतरता भासली नाही. कोणतेही मॉडेल बनवायचे ठरवले तरी साधने असायची. पाच सहा दिवसांत माझी गाडी तयार झाली. एखादे मॉडेल करायचे ठरवले की ते पूर्ण झाल्याशिवाय चैन पडत नाही. जर ते मनासारखे झाले नाही तर त्याला दुसरा आकार द्यायचा.

आत्तापर्यंत मी मोटरसायकल, स्कूटर, ट्रॅक्टर, जीप, कंटेनर, रिक्षा असे विविध मॉडेल तयार केले आहेत. मी केलेल्या कंटेनरचे सर्वांनी खूप कौतुक केले. आई-बाबापण आमच्या घरी येणाऱ्या पाहुण्यांना माझी ही कला आवर्जून सांगतात. या सगळ्यामुळे मला अधिक प्रोत्साहन मिळाले आणि माझ्या या छंदामध्ये अधिकाधिक भर पडली. ■

# मायेचं झाड

एक दिवस अचानक
पोटामध्ये बी गेलं
पाहता पाहता माझंच
बहारदार झाड झालं.

खोडासारखे पाय
पानांसारखी बोटं आली
जागीच डोळे मिटून गेले
हिरवे दोन कान आले.

कोकिळ येऊन पानांमध्ये
कूहू कूहू करू लागला
कावळा येऊन काड्यांचा
खोपा इथे बनवू लागला.

चिऊताई येऊन
पिल्लांशी खेळ खेळी
बुलबुल येऊन पिल्लांना
प्रेमाने खाऊ घाली.

खारूताई इकडे-तिकडे
सर सर फिरू लागली
पोपटही फांद्यांवरती
मौजेने झोके घेई




या साऱ्यांचं झाडाविषयी
वाढू लागलं प्रेम
राहतील ते त्या झाडावर
आनंदाने कायम.

मृणाली साळुंखे
७ वी

# Our Shop of flowers

**Aradhana Patil, 6th**




In Girvi my sisters and I collected beautiful flowers. Some flowers were red, some were blue, pink, white, yellow and orange. Some were small and some were big. I picked big but different leaves. I took all those things and sat on a chair. I thought what shall I do with these flowers and leaves?

Then I got an idea. I decided to make bouquets and sell them. I made many different and beautiful bouquets. I made a board. On that board I wrote- 'Beautiful Flower Bouquets'. My friends Bhargvi, Om, Aditi and my sisters Gayatri, Shreeya, and

Radha helped me for that shop. All the people liked our little shop.

Our shop was under the neem tree. We worked the whole day. All people said, "It's great! What would you do with these coins?" We said, "We have not decided." My Aunt said "Buy some bhel."

We got 22 rupees. We all were happy. Each of us got 4 rupees. But Gayatri got only 3 rupees because she is small. We were very very happy with our work. Our Shop was nice. Did you like our shop?

## Rainy Insects



After the rain
I was on the lawn
All the dirt had gone.

I saw some millipedes
They were a lot,
But where do they live,
I thought.



In the sky,
A nice dragonfly
He says to me,
Bye-bye!!!

**Aradhana Patil, Atharava Hampe**
**Pratik Saste**
**6th**


# Funny Swimming Incident


**Samiksha Dixit, 10th**

When I was in the third standard, in the summer vacation my friend Apurva and I joined the swimming class . We both were learning to swim. There was fear in our minds about water.


One day when I was standing near the tank, Apurva came and suddenly pushed me in the water. I started shouting and crying with fear. Our coach took me out of the water. I became angry with Apurva and decided to push her in the water. I was waiting for an apportunity.

One day I saw that Apurva was standing near the tank. I decided to push her in the water. So I ran fast towards her to push her. But suddenly she moved aside and again I fell in the water. I cried loudly. My plan could not be successful. Everyone began to laugh at me. I will never forget this funny incident.







सोनारकाकांची मुलाखत.



गोठ्याला भेट.



पोत ओवताना



शेणगोठा करताना.